# नाईकनवरे डेव्हलपर्स तर्फे ईगल्स नेस्ट गृहप्रकल्प सादर

**पुणे (प्रतिनिधी) :** आघाडीची रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कंपनी असलेल्या नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे तळेगाव येथे ईगल्स नेस्ट हा नवीन गृहप्रकल्प सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजी करण्यात आले.याप्रसंगी नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.चे अध्यक्ष डी.पी.नाईकनवरे,श्रीमती लता नाईकनवरे,कंपनीचे संचालक हेमंत व रणजित नाईकनवरे तसेच एचडीएफसी बँकेचे असिस्टंट जनरल मॅनेजर (बिझिनेस डेव्हलपमेंट) कार्तिक अय्यर व वडगाव-मावळ येथील माजी आमदार कृष्णराव भेगडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा प्रकल्प वडगाव मावळ येथे एका बाजूला हिरवीगार वनराई आणि दुसऱ्या बाजूला इंद्रायणी नदीच्या सुंदर खोऱ्यामध्ये विकसित करण्यात आला आहे.हिरव्यागार टेकड्या,धबधबे व सर्वदूर पसरलेल्या वनराईने युक्त अशा स्वप्नवत परिसरात स्थित ईगल्स नेस्ट हा गृह प्रकल्प पुण्यापासून अवघ्या ३५-४० किमी अंतरावर आहे. टाऊन हाऊसेस,रो हाऊसेस, डुप्लेक्स अपार्टमेंटस,२ व ३ बीएचके अपार्टमेंटस् व सीझन्स रिसॉर्ट क्लब अशा वैविध्यपूर्ण उपलब्धतता सादर करणारा ईगल्स नेस्ट गृहप्रकल्प म्हणजे खऱ्या अर्थाने आपलं घरं म्हणावे असा सिध्द होणारा आहे. या नवीन प्रकल्पाबाबत बोलताना नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.चे संचालक हेमंत नाईकनवरे म्हणाले की, हा प्रकल्प दोन टप्प्यांत पुर्ण करण्यात येणार आहे. एकूण ४५ एकर जागेत विस्तारलेल्या या प्रकल्पाचा पहिला टप्पा १२ एकरांचा असेल. या टप्प्यामध्ये एकूण ९५ युनिटस् विकसित केले जाणार असून त्यामध्ये ३बीएचके चे ४० युनिटस्, टाऊन हाऊसेसचे ३२, रो हाऊसेसची ७ व डुप्लेक्सची १६ युनिटस् असणार आहेत. सदर प्रकल्प निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचा अनुभव देणाऱ्या सीझन्स रिसॉर्ट क्लबची सुविधा उपलब्ध करून देत असून यामध्ये क्लबहाऊस, हेल्थकेअर सेंटर, मल्टीपर्पज कोर्ट, पार्टी लॉन्स, ॲम्फिथिएटर, कीडस् प्ले एरिया, रेस्टॉरंट व बार यांसारख्या सुविधा असणार आहेत.